आर.सी.सी. क्र.२८१/२०२२

नि.क्र.४२

**<u>सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र. २ यांचा पुरावा</u>**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

माझे नांव – तुकाराम कोंडीबा तिकोणे

वय – ६६ वर्षे, व्यवसाय – शेती,

राहणार–पाडळीदर्या, ता.पारनेर.

**<u>सरतपासणी सहा. सरकारी अभियोक्ता श्री.आर.एस.पटेकर यांचेमार्फत</u>–**

माझा मुळ व्यवसाय शेती आहे. आरोपी माझ्या गावचा असुन तो ओळखीचा आहे. माझ्या शेतात कांदा व इतर पिके असतात. माझ्यागावात बँक नसुन वडझीरेमध्ये सेंट्रल बँक ऑफ इंडीया आहे. माझे सेंट्रल बँकेत सेव्हींग खाते क्र.२३३३१८८५९२ आहे. गौतम जाधव बँकेत कर्मचारी म्हणुन कामाला होते. १६/१०/२०१९ रोजी रु.३०००००/– चा चेक व ५००००/– रुपये रोख असेएकुण रु.३५००००/– ची एक वर्षासाठी १६/१०/२०१९ ते १६/१०/२०२० या कालावधीसाठी एफ.डी. सेंट्रल बँक ऑफ इंडीयामध्ये करण्यासाठी माझी डिपॉझीट पावती गौतम जाधव यांनी केली. तो मला म्हणाला की तुम्ही घरी जा, तुम्हाला ४/५ दिवसांनी पावती देतो. मी ४/५ दिवसांनी गेल्यानंतर त्याने मला ती पावती दिली. मी पावती घेवुन घरी गेलो व ती कपाटात ठेवुन दिली. त्यानंतर एक वर्षानी मुदत संपल्यानंतर दि.१६/१०/२०२० नंतर मी ती पावती घेवुन बँकेत गेलो. बँकेतील मॅनेजर बोरुडे साहेब यांना ती पावती दाखवली. ते व गौतम जावध म्हणाले की पावती मोडायची गरज नाही तुम्ही ती पुढे चालु ठेवु शकता. त्यानंतर ८/१० दिवसांनी मला माझी बँकेतुन फसवणुक झाल्याचे समजले. मी परत पावती घेवुन सेंट्रल बँक ऑफ इंडीया वडझीरे येथे गेलो. तेथे ऑडीटसाठी नगरचे साहेब आले होते. मी त्यांना माझी पावती तपासायला सांगितली. तपासानंतर ती पावती सिस्टमला रुपाली गौतम जावध यांचे नावे जमा झाल्याची कळाले. रुपाली गौतम जाधव ही आरोपीची पत्नी आहे. ऑडीटचे साहेब म्हणाले की पावतीवरील सहया बोगस आहेत.

त्यानंतर दि.२५/१०/२०२१ रोजी नगर एमआयडीसी येथील सेंट्रल बँक

ऑफ इंडीयाचे मुख्य ऑफीस येथे माझी फसवणुक झाल्याबाबत मी व माझ्या मुलाने तक्रारी अर्ज दाखल केला. दि.२७/३/२०२१ रोजी मला पोलीसांनी जबाबासाठी बोलावले. पोलीसांनी माझा जबाब माझ्या सांगण्याप्रमाणे लिहुन घेतला. आता मला आरोपीने दिलेली एफ.डी.ची पावती दाखवण्यात आली. त्यावर आरोपीने माझ्यासमोर सही केली नाही. त्यावर १६/१०/२०१९ ते १६/१०/२०२० चा कालावधी नमुद असुन ती पावती रु.३५००००/– ची आहे. ती पावती तीच असुन त्यास नि.४३ देण्यात येतो. आता मला मुख्य कार्यालय एमआयडीसी शाखा येथे दिलेला तक्रार अर्ज दाखवण्यात आला. तो तोच असुन त्यातील मजकुर बरोबर असुन त्यावर माझीसही व बँकेचा पोहोच मिळाल्याबाबत शिक्का आहे. त्यास नि.४४ देण्यात येतो. आरोपी आज न्यायालयात हजर आहे.

सरतपास पुर्ण.

आरोपीतर्फे अर्ज आल्याने उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.

श्रवणोत्तर स्वीकृती

सही/–

(एन.एस.सबनीस)

दिनांकः ०९/०८/२०२४. न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग, कोर्ट नं.३,

पारनेर.

आर.सी.सी. क्र.२८१/२०२२

नि.क्र.४२

**आरोपीतर्फे उलटतपास विधीज्ञ श्री.एस.एल.ठाणगे यांच्यामार्फतः**

गौतम जाधव यास मी लहानपणापासुन ओळखतो. हे म्हणणे खरे आहे की गावातील बँकेच्या उपकेंद्रातील माझे व्यवहार गौतम जाधव चालवत होता. हे म्हणणे खरे आहे की ज्यावेळेस उपकेंद्रातील व्यवहार चालु होते त्यावेळेस आरोपीने माझे पैसे घेतले अशी काही घटना झाली नाही. पाडळीपासुन देवीभोयरे ६ कि.मी.वर आहे. हे म्हणणे खरे नाही की फाटयापासुन राहणारे लोक माझ्या राजकीय परिचयाचे आहेत. सेंट्रल बँकेच्या संदर्भात झालेल्या घटनेबाबत मोठे आंदोलन झाल्याचे मला आठवत नाही व जितेश सरडे याने बँकेतील कर्मचा–यांनी फ्रॉड केल्याबाबत मोठे आंदोलन केल्याचे मला आठवत नाही. हे म्हणणे खरे आहे की आरोपी हा उपकेंद्रात बँक मित्र होता. मी सांगतो की बँक मित्र म्हणून नाही तर आम्ही त्याला बँक कर्मचारी म्हणुन ओळखत होतो. हे म्हणणे खरे आहे की ज्यावेळी ५००००/– रुपये रक्कम सेल्फ म्हणुन काढली त्यावेळी विद्या उघडे, प्रकाश बोरुडे व इतर बँक कर्मचारी तेव्हा हजर होते. बँकेत मी नेहमी जात नाही. मला बँकेत पैसे जमा करणे व पैसे काढणे एवढे माहीत आहे. ज्यावेळी बँकेत पैसे भरले किंवा पैसे काढले त्यावेळी माझ्या मोबाईलवर एसएमएस येत नव्हता. माझ्या खात्यातुन ज्यावेळी दीड लाख रुपये काढले त्यावेळी बँक कर्मचा–याचा मला फोन आला नव्हता. गौतम जाधव याने मला जी पावती दिली ती मी कोणालाच दाखवली नाही. हे म्हणणे खरे नाही की पावतीवरील सही गौतम जाधवची नाही. मी सांगतो की माझ्यासमोर त्याने सही केली. घटना घडल्यानंतर बँकेचे अधिकारी माझ्या घरी आले नाही. हे म्हणणे खरे आहे की घटना घडल्यानंतर प्रकाश बोरुडे मला भेटले होते. हे म्हणणे खरे नाही की या केससंदर्भात माझे प्रकाश बोरुडेशी बोलणे झाले होते. हे म्हणणे खरे आहे की साडे तीन लाख रुपये रक्कम मला नंतर सेंट्रल बँकेकडुन मिळाली. हे म्हणणे खरे नाही की मी प्रकाश बोरुडेशी भेटल्यानंतर केवळ प्रकाश बोरुडे याला वाचवण्यासाठी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की साडे तीन लाख रुपये मी स्वतःच काढले व त्याचा फायदा घेवुन मी आरोपीविरुध्द खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास संपला.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृती

सही/-

(एन.एस.सबनीस)

दिनांकः १३/०८/२०२४.

न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग, कोर्ट नं.३,

पारनेर.